# ॲग्रोमेटॲडवायझरी बुलेटीन
## ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,
## कृषि हवामानशास्त्र विभाग
## कृषि महाविद्यालय, पुणे ४११ ००५

फोन : ०२०-२९५१६२६४ ई-मेल : amfupune@gmail.com


## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १०/०७/२०२६
## जिल्हा : जळगाव

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१०/०७/२०२६ ते १४/०७/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| पाऊस (मिमी) | 2.0 | 3.0 | 0.0 | 2.0 | 2.0 |
| कमाल तापमान (अं.सें.) | 34 | 35 | 35 | 36 | 36 |
| किमान तापमान (अं.सें.) | 24 | 24 | 23 | 23 | 23 |
| ढग स्थिती (आकाश) | 7 | 6 | 8 | 6 | 7 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 78 | 74 | 72 | 73 | 74 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 63 | 59 | 60 | 53 | 62 |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 16 | 19 | 20 | 20 | 20 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 262 | 262 | 262 | 265 | 268 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक १०, ११, १३ व १४ जुलै, २०२६ रोजी तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता असून दिनांक १२ जुलै, २०२६ रोजी हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • मागील पावसामुळे शेतातील अतिरिक्त पावसाच्या पाण्याचा निचरा करावा.<br>• पावसाची शक्यता असल्याने कीटकनाशकाची व बुरशीनाशकाची फवारणी शक्यतो पावसाची उघडीप बघून करावी.<br>• भाजीपाला पीके जसे वांगी, भेंडी, गवार इ. लागवडीनंतर रसशोषक किडींच्या जैविक नियंत्रणासाठी पीकाच्या अवस्थेनुसार पिवळे चिकट सापळे, सापळा पीके, जैविक बुरशीनाशके (मेटारायझीयम, ट्रायकोग्रामा, व्हरटीसिलीयम इ.) यांचा वापर करावा आवश्यकता असल्यास रासायनिक कीड आणि बुरशीनाशकाचा वापर करावा.<br>• हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामा नाच्या पूर्वानुमाना करिता 'मेघदुत' मोबाईल ॲपचा वापर करावा. मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता 'दामिनी' मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• कृषिविषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषिदर्शनीचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा. |
| कापूस | पीक वाढीची अवस्था | सर्वसाधारणपणे १० दिवसांत सर्व बिया उगवतात , ज्या ठिकाणी बी उगवले नसेल त्या ठिकाणी राखून ठेवलेल्या बियाण्यापासूनच, त्याच सुधारित अगर संकर वाणाचे बियाणे नांग्या भरण्यासाठी वापरावे व लगेच पाणी द्यावे. |
| हुमणी कीड | किडीचे नियंत्रण | हुमणीचे भुंगेरे सुर्यास्तानंतर बाभूळ, बोर, लिंब या झाडांवर पाने खाण्यासाठी गोळा होतात. अशा झाडांच्या फांद्या रात्री काठीच्या सहाय्याने हलवून खाली पडलेले भुंगेरे गोळा करावेत व रॉकेल मिश्रित पाण्यात टाकून मारावेत. हा उपाय शेतकऱ्यांनी सामुदायिकरित्या करावा. त्यामुळे अंडी घालण्यापूर्वीच भुंगेऱ्यांचा नायनाट होईल. हुमणी अळीच्या जैविक नियंत्रणासाठी मेटारिझीयम ॲनिसोप्ली परोपजीवी बुरशी २० कि. प्रति हेक्टर जमिनीत मिसळावे (शेणखतामध्ये मिसळून टाकता आल्यास उत्तम). |
| सोयाबीन | पेरणी | सोयाबीनची पेरणी पुरेसा ओला व्यावर १५ जुलै पर्यंत वेळेत उरकून घ्यावी . पेरणी करताना बीजप्रक्रिया करून पेरणी करावी. |
| केळी | पीक वाढीची अवस्था | पावसाची शक्यता असल्याने झाडे पडू नयेत म्हणून व वजनाने मोठ्या असलेल्या घडास गरजेप्रमाणे बांबूच्या किंवा पॉलीप्रोपेलीनच्या पाट्यांच्या सह्यायाने झाडांना/ घडांना आधार/ टेकू द्यावा.<br>नवीन लागवड मृग बाग साठी शेत तयार करावे. लागवडीसाठी कंद मुनवे निरोगी आणि जातिवंत बागेतूनच निवडावे. ॲझोस्पिरीलम - २५ ग्रॅम व पी.एस.बी.-२५ ग्रॅम/ झाड, केळी लागवडीच्या वेळी शेणखतात मिसळून द्यावीत. वादळी वाऱ्यापासून बागेच्या संरक्षणासाठी सजीव कुंपणाचा वापर करावा. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | पावसाळ्यामध्ये जनावरांना सुरक्षित ठिकाणी बांधावे, जनावरांचा गोठा व आसपासचा परिसर स्वच्छ व हवेशीर ठेवावा पावसाचे पाणी गोठ्यात जाऊ नये याची काळजी घ्यावी. गोठ्याभोवती पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी गोठ्यात ओलसरपणा राहणार नाही याची दक्षता घ्यावी गोठे स्वच्छ व कोरडे ठेवावेत चिखल होऊ देऊ नये. हिरव्या चाऱ्या करिता ज्वारी, बाजरी, मका यासारखे पिकांना प्राधान्य द्यावे. याच बरोबर बहुवार्षिक पिकांमध्ये संकरित नेपियर लसूण घास यासारखी पिके घ्यावीत . साठविलेल्या सुक्या चाऱ्यावर पाणी पडून त्यात बुरशी लागली असेल तर असा चारा जनावरांना देऊ नये तो नष्ट करावा . जनावरांचे खाद्य घटक दमट आद्रता युक्त वातावरणात साठवू नयेत त्यामध्ये भिंतीचा जमिनीचा ओलसरपणा मुरणार नाही याची काळजी घ्यावी. |

*टिप : शेतकरीबंधूनी किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्य ती खबरदारी/ काळजी धेऊन किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.

| | |
|---|---|
| स्त्रोत : १) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.<br>२) मागील हवामान : -<br>ठिकाण : कृ.म.वि., पुणे . दि. : १०.०७.२०२६ | स्वाक्षरीत<br>प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे,ऐएमएफयु, पुणे तथा<br>प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे |